C/593

संशोधन संचनालय
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

डॉ. व्ही. के. खर्चे
संशोधन संचालक

कार्यालय दूरध्वनी: ०७२४ – २२५८४१९
फॅक्स: ०७२४ – २२५८४१९
ई – मेल: director_res@pdkv.ac.in

जा.क्र./DR/TF/841/२०२५ दि. 20/०६/२०२५

## सुधारित परिपत्रक

**संदर्भ:** १. जा.क्र./DR/TF/५३४/२०२५ दि. २७/०६/२०२५

उपरोक्त संदर्भीय नुसार डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामातील शेती निगडीत, फळबाग संबधित, भांडार विभागातील विविध कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरिता ई-निविदा (दुसरी वेळ) प्रक्रिया राबवून सन २०२४-२०२५ व २०२५-२६ या वर्षा करिता वरील संदर्भीय परिपत्रकातील दिलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून प्राधन्याने क्रमशा मे. संकल्प बहुउद्देशिया संस्था, अकोला (मो. न. ९८३४६८७५९९), मे. इनोत्रो मल्टी सर्व्हिसेस, अकोला (मो.न.९१३०००३०८९), मे. आद्या इंटरप्राइजेस, रंभापुर, अकोला (मो.न.८८०५७१०७०१), मे. सान्वी मल्टी सर्व्हिसेस, लातूर (मो.न.९७६४४२७५७०) मे. शुभम इलेक्ट्रीकॅल्स, अकोल (९७६३५९२०५४) व मे. गोपाल सेक्युरीटी गार्ड सर्व्हिसेस, यवतमाळ (मो. न. ९६२३७७९९०३) या नमूद कंत्राटदरांन मार्फत करावयाच्या कामानुसार दर निच्छित करण्यास आले आहे.

सदर दर हे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ अंतर्गत कार्यक्षेत्रामधील असणाऱ्या विदर्भातील ११ जिल्हातील सर्व संचालक, सर्व अधिष्टाता, सर्व विभाग प्रमुख कार्यालये व त्यांचे अधिनिस्त असणारे सर्व कार्यालायाकरिता संदर्भ क्र. १ मधील परिपत्रकातील नमूद असलेले दर लागू राहील.

सोबत: वरील संदर्भीय परिपत्रक.

संशोधन संचालक
डॉ. पंदेकृवी, अकोला

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलसचिव, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीकरिता सादर.
२. मा. नियंत्रक, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीकरिता सादर.
३. मा. कुलगुरूंचे तांत्रिक सचिव यांना मा. कुलगुरू महोदय, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीकरिता सविनय सादर.
४. विस्तार शिक्षक संचालक, पंदेकृवि, अकोला यांना माहितीकरिता व पुढील योग्य कार्यवाहीस
५. अधिष्ठाता सर्व, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीकरिता व पुढील योग्य कार्यवाहीस सादर'
६. सहयोगी अधिष्ठाता सर्व, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीकरिता व पुढील योग्य कार्यवाहीस.
७. मुख्य बिजोत्पादन अधिकारी, मप्राप्र, वणी रंभापूर यांना माहितीस व पुढील योग्य कार्यवाहीस.
८. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीस व पुढील योग्य कार्यवाहीस.
९. विभाग प्रमुख सर्व, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीस व पुढील योग्य कार्यवाहीस.
१०. प्रभारी अधिकारी सर्व, कृषि संशोधन केंद्र यांना माहितीस व पुढील योग्य कार्यवाहीस.
११. कार्यक्रम समन्वयक सर्व, कृषि विज्ञान केंद्र यांना माहितीस व पुढील योग्य कार्यवाहीस.
१२. प्राचार्य सर्व, कृषि तंत्र विद्यालय यांना माहितीस व पुढील योग्य कार्यवाहीस.
१३. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती यंत्रणा कक्ष, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना विद्यापीठ संकेत स्थळावर व्यापक प्रसिद्धी देण्याकरिता सादर.

c/595

# संशोधन संचालनालय

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला ४४४१०४ (महा)

डॉ. व्हि. के. खर्चे
संशोधन संचालक

फोन- (का) ०७२४-२२५८४१९
फॅक्स- ०७२४-२२५८४१९
इ-मेल- director_res@pdkv.ac.in

जा.क्र./DR/TF/ ५३४/२०२५

दि. २७/०५/२०२५

## परिपत्रक

**संदर्भ:** **मा. कुलगुरू कार्यालय मंजूर नस्ती क्र.V/ ५०२ / २०२५ दि. २७ /०५/२०२५.**

उपरोक्त संदर्भीय मंजूर नस्ती मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर व मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामातील शेती निगडीत, फळबाग संबंधित व भांडार विभागातील विविध कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरिता ई-निविदा (दुसरी वेळ) प्रक्रिया राबवून सन २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षा करिता खाली दिलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मा. कुलगुरू, डॉ. पंदेकृवि, अकोला यांचे मान्यतेने भावदर्शक तुलनात्मक तक्त्यामधील सर्वात कमी दर निश्चित करण्यात आलेले असून सर्वात कमी दराला मान्यतेनुसार सदरचे कामे दर्शविण्यात आलेल्या कंत्राटदारा कडून क्रमशा क्रमशा मे. संकल्प बहुउद्देशिया संस्था, अकोला (मो. न. ९८३४६८७५९९), मे. इनोत्रो मल्टी सर्व्हिसेस, अकोला (मो.न.९१३०००३०८९), मे. आद्या इंटरप्राइजेस, रंभापुर, अकोला (मो.न.८८०५७१०७०१), मे. सांन्वी मल्टी सर्व्हिसेस, लातूर (मो.न.९७६४४२७५७०) मे. शुभम इलेक्ट्रीकॅल्स, अकोल (९७६३५९२०५४) व मे. गोपाल सेक्युरीटी गार्ड सर्व्हिसेस, यवतमाळ (मो. न. ९६२३७७९९०३)करण्यात यावे. तसेच सदर कामे परिपत्रकातील नमूद कंत्राटदारांनी कर्ण्यास नकार दिल्यास हीच कामे दुसऱ्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून परिपत्रकातील दिलेल्या अति व शर्ती मध्ये नमूद असलेल्या दस्ताएवजाची तपासणी/शहानिशा करून नमूद दरानुसारच पुढील कामे करण्यात यावी. सदर दर हे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अंतर्गत असणाऱ्या कार्यक्षेत्रामधील विदर्भातील ११ जिल्ह्याकरिता अटी व शर्तींच्या अधीन राहून लागु राहतील. त्यानुसार सदर दर पुढीलप्रमाणे आहेत

**अ) खरीप, रब्बी व उन्हाळी २०२५-२६ करिता शेती निगडीत विविध कामे कंत्राटदाराकडून/खाजगी तत्वावर भाड्याच्या ट्रक्टरने/मालिनी यंत्राने/पंपाने/हर्व्हेसटर/बैलजोडीने करण्याकरिता मागविलेल्या दाराचे विवरण**

| अक्र | कामाचे विवरण | प्रकार | दर रु. प्रति हेक्टर |
|---|---|---|---|
| १ | ट्रक्टर ने नांगरणी | २ फाळ | ३७५०/- |
| २ | ट्रक्टर ने नांगरणी | ३ फाळ | ३०००/- |
| ३ | ट्रक्टर ने पंजीवाही | ५ फाळ | १७५०/- |
| ४ | ट्रक्टर ने तीर्हीवाही/पासावाही | ३ फाळ | १७००/- |
| ५ | ट्रक्टर ने फंटावाही | ९ फाळ | १५००/- |
| ६ | ट्रक्टर ने पट्टीपास | जांभूळवाही | १४००/- |
| ७ | ट्रक्टर ने रोटाव्हेटर | ५ फुट लांब | २८००/- |
| ८ | ट्रक्टर ने साऱ्या पाडणे | | १८००/- |
| ९ | ट्रक्टर ने काकर पाडणे | ४५ सेंमी | १५००/- |
| | | ६० सेंमी | १६००/- |
| | | ९० सेंमी | १६००/- |
| | | १२० सेंमी | १४००/- |
| | | १५० सेंमी | १४००/- |
| १० | ट्रक्टर ने पेरणी<br>सोयाबीन, ज्वारी, कापूस, तूर, उडीद, मुग, हरभरा, तीळ, पौष्टिक तृणधान्य, मका, भुईमुग, गहू, कराड, जवस, करडी, मोहरी, बोरू, ज्यूट, धैंचा | पट्टीपास सह | १७५०/- |
| | | बिना पट्टीपास सह | २१००/- |
| | | बिबिएफ पेरणी यंत्राद्वारे | २२५०/- |
| ११ | ट्रक्टर ने फवारणी | बूम स्प्रेअर सह.<br>सोयाबीन, ज्वारी, कापूस, तूर, उडीद, मुग, हरभरा, तीळ, पौष्टिक तृणधान्य, मका, भुईमुग, गहू, कराड, जवस, करडी, मोहरी, बोरू, ज्यूट, धैंचा | ९००/- |
| १२ | ट्रक्टर ने दांड पाडणे | | १०००/तास |
| १३ | ट्रक्टर ने स्लाशर मारणे | शेतामध्ये | ९००/- |

01596

| | | | |
|---|---|---|---|
| | | रस्त्यालगत व धुऱ्यावर | ३५०/तास |
| १४ | ट्रक्टर ने डवरणी | ४५ सेंमी | १९००/- |
| | | ६० सेंमी | १८००/- |
| | | ९० सेंमी | १८००/- |
| | | १२० सेंमी | १८००/- |
| | | १५० सेंमी | १८००/- |
| १५ | पिकांची मळणी करणे | मळणी यंत्राद्वारे दर रु प्रती क्विंटल . | कम्बाईन हार्वेस्टरने कापणी व मळणी दर रु प्रती हेक्टर . |
| | सोयाबीन | २९० | ३९००/- |
| | मुग | ३२० | ३८००/- |
| | उडीद | ३२० | ३८००/- |
| | तूर | ३३० | ३६००/- |
| | हरभरा | २९० | ४२००/- |
| | करडी | २९० | ३८००/- |
| | मोहरी | २९० | ३८००/- |
| | गहू | २५० | ३७००/- |
| | ज्वारी | २५० | ३७००/- |
| | मका | २२० | ३५००/- |
| | पौष्टिक तृण धान्य | २८० | ३५००/- |
| | धैंचा | २९० | ४२००/- |
| | बोरू | २७० | ४३००/- |
| | ज्यूट | २६० | ४२००/- |
| | जवस | २५० | ३७००/- |
| १६ | वाहनाने विभागावरून मळणी केलेले बियाणे आणणे व भांडार विभागात ठेवणे | वाहन चालक, मजूर व वाहन इंधनासह | ७२/क्विंटल |
| १७ | वाहनाने विभागावरून मळणी केलेले बियाणे आणणे व भांडार विभागात ठेवणे | वाहन चालक, मजूर व वाहन इंधनासह | ८८/क्विंटल /५ किमी |
| १८ | वाहनाने भांडार विभाग येथून बाजार समिती अकोला येथे नेणे | वाहन चालक, मजूर व वाहन इंधनासह | १३०/क्विंटल/३० किमी |
| **बैलजोडीचे कामाचे दर ( औजारे व मजूरासह ,बैलजोडी)** | | | |
| १९ | सोयाबीन, ज्वारी, कापूस, तूर, उडीद, मुग, हरभरा, तीळ, पौष्टिक तृणधान्य, मका, भुईमुग, गहू, कराड, जवस, करडी. मोहरी, बोरू, ज्यूट, धैंचा पिकांची पेरणी करणे | ४५ सेंमी | २०००/- |
| | | ६० सेंमी | १८००/- |
| २० | कापूस तूर पिकांची पेरणी करणे , | ९० सेंमी | १८००/- |
| २१ | काकर पाडणे | ३० सेंमी | २०००/- |
| | | ४५ सेंमी | १८००/- |
| | | ६० सेंमी | १७००/- |
| | | ९० सेंमी | १७००/- |
| | | १२० सेंमी | १५००/- |
| | | १५० सेंमी | १५००/- |
| २२ | चौफुली पाडणे | ४५ x ४५ सेंमी | ३६००/- |
| | | ६० x ६० सेंमी | ३४००/- |
| | | ६० x ९० सेंमी | ३२००/- |
| २३ | डवरणी करणे | ३० सेंमी | २२००/- |
| | | ४५ सेंमी | २०००/- |
| | | ६० सेंमी | १९००/- |
| २४ | वखरणी करणे | ९० सेंमी | १८००/- |
| | | १२० सेंमी | १७००/- |
| | | १५० सेंमी | १७००/- |
| २५ | ट्रक्टर सह टँकरने पाणी पुरविणे | ५००० ली क्षमता ( ८ तासाकरिता ) | १७००/टँकर |
| | | | |

C/597

व खरीप, रब्बी व उन्हाळी हंगाम २०२५-२६ मध्ये शेती निगडीत विविध कामे कंत्राटदाराकडून कंत्राटी पद्धतीने मजुरांकडून करण्याकरिता मागविलेल्या दराचे विविरण

| अक्र | कामाचे विवरण | प्रकार | दर प्रति हेक्टर |
|---|---|---|---|
| १ | काशा /घसकटे//काडी कचरा वेचणे | मजुराद्वारे | २१००/- |
| २ | शेणखत भरणे //उतरविणे/ वाहतूक करणे | वाहन व मजुरासह | १२५०/टन/५ कि.मी |
| ३ | शेणखत पसरविणे | ५ टन प्रती हेक्टर | २३००/- |
| ४ | टोकन पद्धतीने पेरणी करणे | ३० X ६० सेमी | ४६००/- |
| | | ३० X ९० सेमी | ४६००/- |
| | | ९० X १२० सेमी | ४६००/- |
| | | १२० X १५० सेमी | ४४५०/- |
| ५ | विरळणी करणे | ३० X ६० सेमी | १९००/- |
| | | ३० X ९० सेमी | १९००/- |
| | | ९० X १२० सेमी | १९००/- |
| | | १२० X १५० सेमी | १९००/- |
| ६ | खुरपणी /निंदण करणे / | | |
| | खरीप | सोयाबीन, ज्वारी, कापूस, तूर, उडीद, मुग, हरभरा, तीळ, पौष्टिक तृणधान्य, मका, भुईमुग, गहू, कराड, जवस, करडी, मोहरी, बोरू, ज्यूट, धैंचा, सुर्यफुल, हळद व इतर पिके | ४६००/- |
| | | कापूस, तूर | ४६००/- |
| | रब्बी | हरभरा मका ,ज्वारी ,मोहरी ,जवस ,करडी , | ४६००/- |
| | उन्हाळी | तीळ, भुईमुग | ४६००/- |
| ७ | वरखत देणे | सरत्याद्वारे | १२५०/- |
| | | बांगडी पद्धतीने | १२००/- |
| | | हाताने टाकणे | ११००/- |
| ८ | कीटकनाशक, तणनाशक, बुरशीनाशक, सूक्ष्म अन्नद्रव्य फवारणी करणे | पॉवर स्प्रे पंप | ८७५/- |
| | | पॉवर स्प्रे पंप/ हात पंप | ५५/पंप |
| ९ | पिकाला पाणी देणे | पट पाणी पद्धत | १३००/- |
| | | तुषार सिंचन (स्प्रिंकलर पद्धतीने) | १२००/- |
| १० | पिकाला पाणी देणे | डीझेल इंजिन, तुषार संच व मजुरासह (८ तास एक पाळी) | ५९००/- |
| | | विद्युत पंप / पाणबुडी तुषार संच व मजुरासह (८ तास एक पाळी) | ५९००/- |
| ११ | पिक काढणी/ कापणी करणे | मुगाच्या शेंगा तोडणे उपनने व पोते भरणे ,शेंगा बडवीने , | ४७००/- |
| | | सोयाबीन उडीद कापणे व खळ्यावर जमा करणे , | ८८००/- |
| | | ज्वारी, बाजरी, मका कणीस खुडणे , कडबा कापणी व बांधणी करणे व खाल्यावर जमा करणे | ८६००/- |
| | | गहू कापणे व बांधणे खळ्यावर जमा करणे , | ३७००/- |
| | | तूर कापणी व बांधणीव उपनने व पोते भरणे ,बडवणे ,जमा करणे , | ७४९०/- |
| | | भुईमुग काढणी शेंगा तोडणी व पिक जमा करणे , | ६३५०/- |
| | | हरभरा कापणेगोळा करणे व गंजी लावणे , | ८८००/- |
| | | सुर्यफुल, ओवा, कराळ, मोहरी, तीळ, जवस काढणे , गोळा करणे, बडविणे व पोते भरणे | ६४००/- |
| | | करडी कापणे गोळा करणे व गंजी लावणे , | ६२००/- |
| | | पौष्टिक तृण धान्य कापणे गोळा करणे व गंजी लावणे , | ५९००/- |
| | | बोरूज्यूट ,धैंचा , कापणेगोळा करणे व गंजी लावणे , | ६२००/- |
| १२ | बैल राखणे,चारणे व शेन काढणे | १० जनावर पर्यंत | ७०० मजूर |
| १३ | कडबा रचणे | १००० पेंड्या पर्यंत | १२००/१००० पेंड्या |
| १४ | कापूस वेचणे | | १६.५०/किलो |
| १५ | कापूस बोजा भरणे | बोजा भरणे ( २ क्विंटल) | ६०/बोजा |
| १६ | ऊस/हळद | सऱ्या तोडणे / ,ऊस लागवड ,घोळणे ,टिपऱ्या तयार करणे | ११००/- |
| १७ | पाण्यासाठी दांड तयार करणे | | १०४०/- |
| १८ | अड्डान काढणे उपटणे / | | ३२००/- |

c/ 538

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | बिजोत्पादन पिकातील भेसळ काढणे | | २२००/- |
| २० | ऊस | कापणी बांधणी गंजी लावणे , | ९००/- |
| २१ | प्रक्षेत्रावरील पिक राखणे (सर्व साहित्यासह उदा. गमबूट, शिटी, काठी, टॉर्च ई. ) | १० हेक्टर व प्रती दिवस ( २४ तासाकरिता ) | २१९०/१० हेक्टर/दिवस |

**क) सन २०२५-२६ मध्ये बियाणे प्रक्रिया केंद्र व भांडार विभागातील कामे**

| अक्र | करावयाचे कामे | तपशील | दर प्रती क्विंटल |
|---|---|---|---|
| १ | सर्व प्रकारची बियाणे स्वच्छ करणे | | ८०/- |
| २ | बियाणे चाळणी करणे वजन करणे , | चाळणी करून वजन करणे | ५०/- |
| ३ | बियाणे लोडिंग व अनलोडिंग करणे | बियाणे पोते वाहनामध्ये/भांडार गृहामध्ये लोडींग व अनलोडिंग करणे | ७८/- |
| ४ | वाहनाने विभागावरून मळणी केलेले बियाणे आणणे व भांडार विभागात ठेवणे | वाहन वाहन चालक व मजुरासह , | ७८/- |
| ५ | वाहनाने विभागावरून मळणी केलेले बियाणे आणणे व भांडार विभागात ठेवणे | | ९५/ क्विंटल /५ किमी<br>९५/ क्विंटल /१० किमी |
| ६ | वाहनाने भांडार विभाग येथून कृषि उत्पन्न बाजार समिती अकोला येथे वाहतूक करणे | | १२०/ क्विंटल /५ किमी<br>१३८/ क्विंटल /३० कि.मी. |
| ७ | बियाण्याच्या पोत्यांची थप्पी लावणे | | ५०/- |
| ८ | बियाणे प्रक्रीयाची कामे | बियाणे प्रक्रिया | ८५/- |
| | | बीज प्रक्रिया पॅकींग व टॅगिंग | १२०/- |
| ९ | बियाणे प्रक्रिया केलेल्या बियाण्याची लोडिंग व अनलोडिंग करणे | लोडिंग व अनलोडिंग करणे (पोत्याची थप्पी लावणे) वाहन व मजुरास | ९५/- |
| १० | कपाशी जिनिंग करणे | | १३५/- |
| ११ | कापूस व सरकी स्वच्छ करणे | | १३०/- |
| १२ | भुईमुगाच्या शेंगा फोडणे व साफ करणे | | १३५/- |

**ड) सन २०२५-२६मध्ये फळबागेतील करावयाची विविध कामे**

| अक्र | करावयाची कामे | तपशील | दर रु. |
|---|---|---|---|
| १. | फळ लागवडीसाठी गड्डे करणे | १ X १ | १०/गड्डा |
| | | २ X २ | २०/गड्डा |
| | | ३ X ३ | ४०/गड्डा |
| २. | फळबाग आखणी करणे | | ९००/हेक्टर |
| ३. | रोपांची लागवड (रोप लावणे व गड्डे भरणे ) | | ५/रोप |
| ४. | गादी वाफे तयार करणे | | १३५/वाफा |
| ५. | प्लास्टिक आच्छादन करणे (आच्छादन व छिद्र करणे) | | ९००/हेक्टर |
| ६. | फळ झाडांची छाटणी करणे | झाडांचे वय | |
| | | १ वर्ष | १.५०/झाड |
| | | ३ वर्ष | १०/झाड |
| | | ५ वर्ष ते ७ वर्ष | २५/झाड |
| ७. | ट्रकटरच्या सहाय्याने फवारणी करणे / कीटकनाशक) (सूक्ष्म अन्नद्रव्य / बुरशीनाशक / तणनाशक | | ६००/हेक्टर |
| ८. | हाताच्या पाठीवरच्या पावर स्प्रे ने फवारणी करणे/ (सूक्ष्म अन्नद्रव्य / बुरशीनाशक / तणनाशक / कीटकनाशक) | | ६००/ हेक्टर |
| | | | ३०/पंप |
| ९. | फळ झाडांना बोर्डो मिश्रण लावणे | २ ते ५ वर्षापर्यंतचे झाड | १५/झाड |
| | | ६ वर्षे व त्यावरील झाड | २०/झाड |
| १०. | फळ बागेला खते देणे ( सेंद्रिय / रासायनिक) | | ५/झाड |
| ११. | फळ झाडांना आळे करणे | | ३०/आळे |
| १२. | फळ झाडांच्या आळेची उखरी करणे | | ७००/हेक्टर |
| १३. | फळबागे मध्ये निंदन खुरपणी करणे / | | १६५०/हेक्टर |

c/599

| | | | |
|---|---|---|---|
| १४. | फळ बागेची रखवाली चौकीदारी करणे /<br>(सर्व साहित्यासह उदा(.गमबूट ई ,शिट्टी ,काठी ,टॉर्च . | १० हे (२४ तासाकरिता ) | २१००/१० हेक्टर/२४ तास |
| १५. | फळ बागेला दांड पद्धतीने पाणी देणे | | ७००/हेक्टर |
| १६. | फळ बागेतील खाडे भरणे | रोप कलम/ | १५/रोपकलम/ |
| १७. | फळबागेमध्ये रोटाव्हेटर करणे | | २३००/हेक्टर |
| १८. | फळबागेत ९ दाती फंटावाही करणे | | १५००/हेक्टर |
| १९. | फळबागेत पंजीवाही करणे | | १३००/हेक्टर |
| २०. | फळबागेत नागरणी करणे ( दोन फाळ) | | २८००/हेक्टर |
| २१. | फळबागेत नागरणी करणे ( तीन फाळ) | | २५००/हेक्टर |
| २२. | फळ झाडांना कलम करणे | | ६/झाड |
| २३. | कलमांचे बॅग भरणे | प्रती बॅग | ५/बॅग |
| २४. | कलम रोपे तयार करणे/ | प्रती कलम / रोप | ५/कलमरोप/ |
| | | | |

**इ) सन २०२५-२६ मध्ये कर्मशाळा विभागातील व इतर कामे**

| अक्र | करावयाची कामे | तपशील | दर रु. प्रती दिवस / ८ तास |
|---|---|---|---|
| १. | ट्रक्टर ट्रक व इतर वाहने दुरुस्ती करणे ,पिकअप ,ट्रक ,मिनी ,जीप , | प्रती मजूर/ ८ तास | ६५०/- |
| २. | मेक्यानिक व वेल्डर यांचे वाहने कामामध्ये मदत करणे ,यंत्र दुरुस्ती ,कृषि औजारे , | प्रती मजूर/ ८ तास | ५६०/- |
| ३. | वाहनांचे चे वेल्डिंग कामे तसेच कृषी औजारे व यंत्रे यांची दुरुस्तीची कामे .कृषी औजारे ई , | प्रती मजूर/ ८ तास | ६९०/- |
| ४. | वाहनांची पंचर दुरुस्ती | प्रती मजूर/ ८ तास | ६२०/- |
| ५. | जीप ट्रक व इतर वाहने चालविणे ,पिक अप ,मिनी ट्रक ,कार , | प्रती मजूर/ ८ तास | ६७५/- |
| ६. | ट्रक्टरने शेती संबंधित तीनही हंगामातील कामे करणे (ट्रक्टर चालक) | प्रती मजूर/ ८ तास | ७००/- |
| ७. | जेसीबी चालक ऑपरेटर / | प्रती मजूर/ ८ तास | ९००/- |
| ८. | कार्यालयातील दैनंदिन कामे जसे कार्यालय उघडणे व बंद करणे, कार्यालयातील साफई करणे, डिझेल वाटप करणे, इत्यादी सफाई करणे | प्रती मजूर/ ८ तास | ४७०/- |
| ९ | शेती निगडीत कामे करण्याकरिता कुशल मजूर | प्रती मजूर/ ८ तास | ५६०/- |
| १० | शेती निगडीत कामे करण्याकरिता अकुशल मजूर | प्रती मजूर/ ८ तास | ४७०/- |
| ११ | कार्यालयातील दैनंदिन कामे जसे भांडार गृह उघडणेव बंद करणे कार्यालयातील साफ . .ई .सफाई करणे | प्रती मजूर/ ८ तास | ४७०/- |
| १२ | बीज प्रक्रिया मशीन ओपरेटर | प्रती ८ तास | ९००/- |

## अटी व शर्ती

१. कंत्राटदाराकडे संबधित कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबधीत इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

२. ई निविदामाधीम संबंधित कामे कात्रांट पद्धतीने करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करण्यात यावे तसेच त्या कराचा बिहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदाधारकाची राहील. करा सबंधी कोणतीही तक्रार असल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

३. कंत्राट पद्धतीने प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम, संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच बीजप्रक्रिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

४. मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वाणी रंभापूर व मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला अंतर्गत संपूर्ण विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम, संशोधन प्रयोग संबंधित कामे करीत असतांना पिकांचे/फळबागेचे तसेच विभाग व इतर विभाग संबधित तांत्रिक कामे करीत असतांना यंत्राचे/वाहनाचे/नवीन/सुट्या भागाचे ई नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबधित कंत्राट दाराकडून वसूल करण्यात येईल.

c/600

५. प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन कार्यक्रम संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच बीजप्रक्रिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबंधित कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

६. विभागावर देण्यात आलेले बिजोत्पादन कार्यक्रम, संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच बीजप्रक्रिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबंधित तांत्रिक कामे पूर्ण करण्यात यावे. कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

७. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या नियमांचे पालन करणे संबधित कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

८. कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी.अन्यथा देयक अदा केले जाणार नाही .

९. या कार्यालया तर्फे कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यकम, संशोधन प्रयोग सबंधित कामे करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही. सबंधित काम करण्याकरिता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी सबंधित कंत्राटदाराची राहील.

१०. कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यक्रम, संशोधन प्रयोग सबंधित कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत केल्यावर तसेच संबधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल .

११. प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन कार्यक्रम, संशोधन प्रयोग सबंधित कामे तसेच बीजप्रकिया केंद्र, व वाहन विभाग सबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांना, कामगार ( Labour Act) कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी देणे, क्याशलेस पद्धतीचा अवलंब करणे तसेच सर्व प्रकारचे करांचा नियमाने व नियमित भरणा करणे इत्यादीची संपूर्ण जबाबदारी सबंधित कंत्राटदाराची राहील.

१२. प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन कार्यक्रम, संशोधन प्रयोग संबधित कामे तसेच बीजप्रकिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग, व इतर विभाग संबधित कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/मा. संशोधन संचालक डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला यांचे समक्ष मिटविला जाईलव अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१३. प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन कार्यक्रम, संशोधन प्रयोग संबधित कामे तसेच बीजप्रकिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग, व इतर विभाग संबधित तांत्रिक कामे खरीप,रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामा करिता असून कामाचे दर दोन वर्षाकरिता वैध राहतील.

१४. बिजोत्पादन कार्यक्रम संशोधन प्रयोग संबधित कामे तसेच बीजप्रक्रिया केंद्र व वाहन विभाग संबधित तांत्रिक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी हे १८ वर्षाच्या वर असावे तसेच ६० वर्षापेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिक दृष्ट्या सक्षम असावेत.

१५. बीज प्रक्रिया केंद्रे, विकास विभाग, कर्मशाळा विभाग, व इतर विभाग संबधित तांत्रिक कामे करण्यासठी पुरविण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्याकडे संबधित तांत्रिक कामाची पदविका/आयटीआय प्रमाणपत्र/ वाहन चालविण्याचा परवाना व कामचा अनुभव असणे बंधनकारक राहील.

१६. विभागाच्या प्रक्षेत्रावर बीजप्रकिया केंद्र, व वाहन विभाग संबधित तांत्रिक कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपधात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत कंत्राटदाराची राहील.

१७. ट्रक्टर चांगल्या स्थितीत असावा व सोबत असलेले अवजारे व यंत्र चांगल्या दर्जाचे असणे आवश्यक राहील.

१८. ट्रक्टरची सर्व कामे हि कार्यालयीन वेळेतच करून घेण्यात येईल.

१९. ज्या विभागावर काम उपलब्ध असेल त्याच विभागावर काम करावे लागेल.

२०. विभागावर देण्यात आलेले काम पूर्ण करण्यात यावे. अर्धवट काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

२१. ट्रक्टरची कामे करत असतांना कोणत्याही प्रकारचे नुकसान जीवितहानी व अपघातास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत कंत्राटदाराची राहील.

२२. ट्रक्टर चे कामे करत असतांना विद्यापीठाच्या मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची जबाबदारी घ्यावी. होणाऱ्या नुकसानीस सर्वस्वी कंत्राटदारास जबाबदार धरण्यात येईल व नुकसान भरपाईची वसुली करून घेण्यात येईल .

२३. कार्यलयीन पद्धती प्रमाणे समाधानकारक कामाचे देयक अकोला कार्यालयाकडून मंजूर झाल्यावरच आपल्याला कामचा मोबदला/ देयक खर्च दिले जाईल त्यामुळे वरवर विचारणा करू नये.

२४. सदर कामे कार्यालयीन दैनंदिन स्वरुपाची असतील व शासकीय नियमाप्रमाणे प्रतीदिन आठ तासाचे काम असेल.

C/601

२५. एखादया कंत्राटी मजुरास कुठल्याही दिवशी कामावर हजर राहणे शक्य नसल्यास अशा परिस्थितीत पर्यायी व्यक्तीची व्यवस्था लावण्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेची असेल.

२६. सदर कामे हि पुर्णता बह्यस्त्रोता मार्फत कंत्राटी पद्धतीने करावयाची असल्याकारणाने मजुराच्या जेष्ठता यादीत कामाची अथवा कामावरच्या हजेरीची नोंद होणार नाही व तसा कुठलाही दावा करता येणार नाही .

२७. कोणत्याही कंत्राटी कामगारास कामावर ठेवणे व काढून टाकणे याबाबत संपूर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीत अधिकार्यांकडे असतील.

२८. कामावरील कंत्राटी कामगारास अपघात विमा, महागाई भत्ता, भविष्य निर्वाह निधी खाते व वेळोवेळी शासन निर्णयानुसार कंत्राटी मजुराचे देय लाभ उपलब्ध करून देण्याची संपुर्ण जबाबदारी सेवा पुरविणारा कंत्राटदार/संस्था यांची राहील.

२९. सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदारास बाल मजूर कायद्याचे पालन करणे बंधनकारक राहील.

३०. कंत्राटदाराने नेमलेल्या कामगाराचा पगार,रजा, ग्रॅज्युएटी,बोनस,विमा, योजना,पि.एफ, ई.एस.आय.सी. इत्यादी देय बाबी तसेच वेळोवेळी शासनाच्या निर्देशानुसार देय/वेतन देण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदारांची राहील याबाबतील काही तंटा निर्माण झाल्यास कार्यालय हस्तक्षेप करणार नाहीत अथवा कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची अथवा विद्यापीठाची राहणार नाही.

३१. कंत्राटदाराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी कामगार किमान वेतन कायद्यानुसार आवश्यक ते सर्व अभिलेख उदा. हजेरी नोंद,वेतन वाटप नोंद, दैनंदिन कामाच्या नोंदी इत्यादी नोंद वह्या ठेवणे व ते सबंधित प्राधिकरणाद्वारे तपासून घेणे बंधनकारक असून, त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदार/पुरवठादाराची राहील.

३२. कामगारच्या वैयक्तिक खात्यावर पि.एफ.विमा व इतर भरणा केलेले चलन/पावती प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात देयक सादर करतेवेळी सादर करणे बंधनकारक राहील.

३३. प्रत्येक कामगारास साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक राहील याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३४. शासकीय कामगारास कॉन्टॅक्ट ॲक्ट मधील नमुन्याप्रमाणे ओळखपत्र देणे कंत्राटदारास बंधनकारक असून कामाच्या दिवशी सदरील ओळखपत्र कामगाराकडे असणे गरजेचे आहे.

३५. कंत्राटी मजुरास काम करतेवेळी इजा, अपघात अथवा मूत्यू स्भाविल्यास किवा नैसर्गिक आपत्ती उदाप्राणी आणि ,मशिनरी ,पाऊस भूकंप ,विज , वाढळामुळे इजा अपघात अथवा मूत्यू संभविल्यास त्याची सर्व भरपाई आणि इतर कायदेशीर जबादारी कंत्राटदाराची राहील याचा या कार्यालयाशी अथवा विद्यापीठाशी कुठल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

३६. कंत्राट पद्धतीने मजूर पुरवठा करण्याचे काम सब कॉन्टॅक्ट/कंपनी किंवा इतर व्यक्तींना देता येणार नाही तसे केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांचा करार रद्द करण्यात येईल आणि त्यानंतर कार्यालयाचा तसेच विद्यापीठच्या कोणत्याही प्रकियेत संबंधित कंत्राटदारास भाग घेता येणार नाही.

३७. पुरविण्यात येणाऱ्या कुशल व अकुशल मजुरांना ई.सी.आय.एस. उतरविणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. याबाबतची कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३८. कार्यालयाकडून विलंबाने देयक जमा झाले तरी प्रत्येक वेतन पुढील पाच तारखेपर्यंत संबंधीत मजुरांना अदा करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील किमान वेतन कायद्यानुसार अदा केल्याची माहिती ई.सी.आय.एस., पी एफ कामगार कल्याण निधी यांची कामगारांना व त्याचे योग्य त्या शासकीय खात्याला जमा केल्याची नोंद व चलान प्रत्येक महिन्यात देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

३९. कामावर ठेवलेल्या मजुरांना हजेरी पत्रक कामाच्या प्रत्येक ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे. संबंधीत कार्यालय प्रमुखास केव्हाही हजेरीपत्रक तपासण्याचा अधिकार राहील.

४०. कंत्राटदाराकडून वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास अथवा कंत्राट मजुरांचे काम समाधानकारक नसल्याचे आठळून आल्यास सदरचा कंत्राट तातडीने रद्द करण्यात येईल.

४१. शासकीय नियमानुसार देय होणारे शासकीय कर संबंधित दरपत्रकात नमूद केलेल्या दरात काम करावयाची समर्थता दर्शविल्यास त्यांना काम देण्याचे हक्क कार्यालयाच्या समितीला राहतील तसेच दृतीय क्रमांकाच्या दरपत्रक धारकाने असमर्थत दर्शविल्यास तृतीय क्रमांकाच्या लघुत्तम दरपत्रक धारकाने प्रथम क्रमांकाच्या दरपत्रक धारकाच्या दरात काम करण्याची समर्थता दर्शविल्यास यांना काम देण्याचे हक्क दरपत्रक समितीस राहतील.

४२. या प्रक्रियेबाबत कुठलेही न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास अधिकार क्षेत्र अकोला जिल्हा न्यायालय राहील.

४३. सर्व प्रक्षेत्रावरील कामे एकाच वेळेस आल्यास प्रक्षेत्रावरील कामे वेळेत होण्याच्या दृष्टीने -L१ नुसार कामे एका पेक्षा जास्त कंत्राटदारास वाटून देण्याचे अधिकार काम करून घेणाऱ्या संबंधित विद्यापीठातील अधिकारी यांना राहतील.

४४. कामाचे अदेशानुसार एकूण कामाचे रक्कमेच्या २% रक्कम सुरक्षा ठेव म्हणून जमा करणे बंधनकारक राहील व दिलेली कामे विहित मुदतीत करून देणे बंधनकारक राहील..

c/602

४५. कंत्राटदारामार्फत प्रक्षेत्रावर काम करीत असलेल्या कुशल/अर्धकुशल/अकुशल स्त्री/पुरुष मजुरांना विद्यापीठ आस्थापनेवर नियमित सेवा मागण्याचा अथवा त्यासंबंधी न्यायालयीन प्रकरण दाखल करण्याचा अधिकार राहणार नाही. भविष्यत अशी परिस्थिती उद्भवल्यास नाही याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

४६. वस्तू व सेवा कर (GST) २% व आयकर टीडीएस १% संबंधी कंत्राट दारांमार्फात प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यानुसार असे सूचित करण्यात येते कि, वस्तु व सेवा कर (GST) २% व आयकर टीडीएस १% हे देयक रक्कमेवर कपात करण्यात येईल व संबंधित कंत्राटदारास सदर कर कपातीचा त्रैमासिक परतावा दाखल (quarterly return) करून सदर कराचा परतावा मिळवता येईल.

४७. कामाचा आदेश मिळालेल्या कंत्राटदारास प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष काम सुरु असतांना काम सुरळीत चालण्याचे दृष्टीने कंत्राटदार स्वत: अथवा पूर्णवेळ पर्यवेक्षक नेमून कामाचा सतत पाठपुरावा व देखरेख करणे बंधनकारक राहील. हे कार्यालय किंवा संबंधित विभागाचे कर्मचारी त्यामध्ये गुंतून राहणार नाही तर सुरळीत व वेळेत काम पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी हि कंत्राटदाराची राहील.

४८. प्रक्षेत्रावरील पिक/फळबाग राखण करणे (१० हेक्टर/२४ तास) करिता ५ राखणदार/पहारेकरी ठेवणे त्या कामाचा आदेश दिलेल्या कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

४९. पिक नुकसान भरपाई वसूल करण्याकरिता खालील बाबींचा समावेश असेल-

अ) पिकाचे वाण व दर्जा

ब) नुकसान झालेले पिकाखालील क्षेत्र

क) पिकाचे वाण व दर्जा नुसार विद्यापीठ प्रशासनाने नेमून दिलेले बियाणे उत्पन्नाचे लक्षांक.

ड) पिक वाण व दर्जा नुसार विद्यापीठ प्रशासनाने त्या वर्षाकरिता मंजूर केलेले बियाण्याचे दर नुकसान भरपाई बाबतीत विभागावरील पिकांचे बियाणे दर्जा नुसार येणारे अपेक्षित उत्पादन क्विंटल याप्रमाणे वसुली पात्र राहील.

५०. विभागावरून उत्पादित झालेल्या बियाण्याचे भांडार विभाग येथे कंत्राटदारामार्फात वाहनाने वाहतूक करतेवेळी धरम काट्यावर वजन करण्याचा खर्च प्रती क्विंटलप्रमाणे संबंधित कंत्राटदारास अदा करणे बंधनकारक राहील.

५१. ई-निविदा प्रक्रियेतील व वरील नमूद सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असल्याचे रु ५०० चे स्टंप पेपर वर करारनामा सादर करणे संबधित कंत्राटदारास बंधनकारक राहील.

संशोधन संचालक
डॉ. पंदेकृवि, अकोला

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलसचिव, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीकरिता सादर.
२. मा. नियंत्रक, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीकरिता सादर.
३. मा. कुलगुरूंचे तांत्रिक सचिव यांना मा. कुलगुरू महोदय, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीकरिता सविनय सादर.
४. सर्व सहयोगी अधिष्ठाता, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीकरिता सादर.
५. मुख्य बिजोत्पादन अधिकारी, मप्राप्र, वणी रंभापूर यांना माहितीस व पुढील योग्य कार्यवाहीस.
६. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीस व पुढील योग्य कार्यवाहीस.
७. सर्व प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र यांना माहितीस व पुढील योग्य कार्यवाहीस.
८. सर्व कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र यांना माहितीस व पुढील योग्य कार्यवाहीस.
९. सर्व प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय यांना माहितीस व पुढील योग्य कार्यवाहीस.
१०. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती यंत्रणा कक्ष, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना विद्यापीठ संकेत स्थळावर व्यापक प्रसिद्धी देण्याकरिता सादर.